दै. गोदातीर दि. २८.०१.२०२५

# मोक्कामधील तेरा वर्षापासून फरार असलेला आरोपी परभणी येथून अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या दप्तरी संघटित गुन्हेगारी प्रतिबंध अधिनियम (मोक्का) अंतर्गत गुन्हा दाखल असलेला अट्टल गुन्हेगार मागील तेरा वर्षापासून आपले नाव बदलून फरार होता. अखेर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने आरोपी छत्रपती उर्फ शिवाजी भोसले याला परभणी येथून अटक केली आहे.

बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी पोलीस ठाण्यात सन २०११ च्या जानेवारीमध्ये आरोपी छत्रपती उर्फ शिवाजी उर्फ पिंटू उर्फ बालाजी रामा उर्फ रामजी भोसले (वय ३९) रा. पिंपळगाव ता. लोहा सध्या रा. इंदिरानगर लोहा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच्याविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात संघटित गुन्हेगारी प्रतिबंध अधिनियम मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यापासून तो फरार होता.

जिल्ह्यातील फरार आणि पाहिजे असलेल्या आरोपींच्या मुसक्या आवळण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आपल्या अधिनस्त यंत्रेणला दिल्या. यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपल्या पथकांना आदेश दिले. सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे व त्यांच्या सहकाऱ्यांना फरार आरोपींची गोपनीय माहिती काढून त्यांच्या मुसक्या आवळण्याचे आदेश दिल्यावरून लिंबगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गुंडेराव करले, स्थागुशाचे अंमलदार देवा चव्हाण, तानाजी शेळके, मोतीराम पवार, राजू बोदगिरे, इसराइल शेख, अनिल बिरादार, साहेबराव कदम, मिलिंद नरबाग यांच्यासोबतच सायबर सेलचे राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे आणि पोलीस उपनिरीक्षक बळीराम दासरे यांना सोबत घेऊन गोपनीय माहिती काढली. आरोपी छत्रपती उर्फ शिवाजी भोसले हा परभणी परिसरात नाव बदलून व बदललेल्या नावाचे नवीन आधार कार्ड तयार करून वास्तव्य करत असल्याची अधिकृत माहिती पोलिसांना मिळाली. त्यांनी परभणी जिल्ह्यात जाऊन त्याला पूर्णा तालुक्याच्या हद्दीतून ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने कुंडलवाडी पोलीस ठाण्यात माझ्याविरुद्ध मोक्काअंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर मी फरार होतो अशी कबुली दिली. स्थानिक गुन्हे शाखेने पकडलेल्या फरार आरोपीला कुंडलवाडी पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

दै. गोदातीर दि. २८.०१.२०२५

# घातक शस्त्र बाळगणाऱ्या तिघांना अटक; 'स्थागुशा'ची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने बिलोली तालुक्यातील चिंचाळा फाटा येथील तिघाना पकडून त्यांच्याकडून आठ तलवारी आणि खंजीर जप्त केले आहेत. तसेच त्यांची दुचाकी जप्त केली आहे.

दि. २५ जानेवारी रोजी स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी पोलीस उपनिरिक्षक आनंद बिचेवार आणि त्यांचे सहकारी पोलीस अंमलदारांना पाहिजे आणि फरार असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत रवाना केले. पथकाने चिंचाळा फाटा ता. बिलोली



येथे त्यांनी एका दुचाकीवरवर तीन जण पाहिले. त्या तिघांना थांबवले असतांना त्यांच्याकडे वेगवेगळ्या प्रकारच्या तलवारी, खंजरी असे घातक ८ शस्त्र सापडले. एकाच दुचाकीवर तिघे बसून जाणारी दुचाकी (टी.एस. १६ एफ.ई.६२९२) जप्त करण्यात आली आहे. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ६५ हजार ५०० रुपये आहे.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक आनंद बिचेवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार बिलोली पोलीस ठाण्यात सुमंतसिंग जेलरसिंग ठाक (वय २४) रा. बोधन जि. निजामाबाद, संदीपसिंग दरबारसिंग बावरी (वय १९) रा. बोधन जि. निजामाबाद, संजुसिंग चरणसिंग ठाक (वय २४) रा. बोधन जि. निजामाबाद या तिघांविरुध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस अंमलदार शिंदे हे करत आहेत.